**PRESS RELATIONS DIVISION**, Central Office, Post Box 406,
Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**RESERVE BANK OF INDIA**
**RBI On Internet:**
http://www.rbi.org.in
**Email: helpprd@rbi.org.in**

फेब्रुवारी २४, २००४

**चालू खात्यावरील व्यवहारांचे अधिक उदारीकरण**

चालू खात्यामधील व्यवहारांचे अधिक सरळीकरण व उदारीकरण करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने फॉरेन एक्स्चेंज मॅनेजमेंट ऍक्ट (करंट अकाउंट ट्रॅन्झॅक्शन्स) रुल्स, २००० अन्वये भरण्याच्या खालील प्रकारांमध्ये अधिकृत विक्रेत्यांना मुक्तपणे व्यवहार करण्याचा निर्णय जाहीर केला आहे :

- कलाकारांनी, उदा. कुस्तीगीर, नर्तक, मनोरंजन करणाऱ्या व्यक्ती इ. चे भरणे
- परदेशातील प्रतिनिधींना, निवासी भूखंडांच्या विक्रीसाठी देण्यात येणारे कमिशन, कमाल रक्कम २५००० अमेरिकन डॉलर किंवा आवक होत असलेल्या भरण्याच्या ५ टक्के, यापैकी जास्त असेल ते.
- भारतीय कंपन्यांच्या परदेशस्थ कार्यालयांना लघु मुदतीचा पतपुरवठा
- जेथे निर्यात उत्पन्न रु. १० लाखांहून कमी असेल अशा बाबतीत परदेशी टेलिविजन वर जाहिरातींसाठीचा भरणा.
- जेथे करार रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत नसतील अशा बाबतीत स्वामित्व शुल्क आणि एक रकमी फी साठीचा भरणा, मात्र जर हे पेमेंटस, फेमा (करंट अकाउंट ट्रॅन्झॅक्शन्स) रुल्स २०००च्या सूचि II मध्ये दिलेल्या प्रमाणपद्धतींनुसार असतील तरच.
- ट्रेड मार्क / फ्रँचाइझच्या वापराबद्दल भरणा. ट्रेडमार्क/फ्रँचाइझ यांच्या खरेदीसाठी पुढेही रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

या व्यवहारांसाठी पूर्वीही रिझर्व्ह बँकेची पूर्वपरवानगी आवश्यक होतीच. त्याचप्रमाणे, एखाद्या परदेशस्थ कंपनीकडून व्यक्तिगत आरोग्य विमा मिळविण्यासाठी केलेल्या भरण्यासाठी आता यापुढे भारत सरकारच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता राहणार नाही.

अधिकृत विक्रेत्यांना कार्यवाहीसंबंधी चे मार्गदर्शक सिद्धांत पाठविण्यात येत आहेत.

**पी.व्ही. सदानंदन**
व्यवस्थापक

**प्रेस रिलीज : २००३-२००४/१०१९**